रे.मु.नंबर 247/2012 मधील निशाणी 29 चे अर्जावरील आदेश.

धनंजय बनसोडे वि. मारुती बनसोडे.

वादीने प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी नंबर 3 चे वारस रेकॉर्ड वर आणणेसाठी व दुरुस्ती बाबत दिलेला आहे.

अर्ज कथने संक्षिप्तेत खालील प्रमाणे :-

2. यातील प्रतिवादी 3 लाला बाळा महार उर्फ बनसोडे हे दिनांक 19/02/2013 रोजी मौजे चौभेपिंपरी ता. माढा येथे मयत झाले आहेत त्याबाबतचा उतारा दाखल केला आहे त्याचे वारस रेकॉर्डवर आणणेसाठी त्याचे नांवापुढे प्रतिवादी 3 अ ते 3 फ असे वारसांची दुरुस्ती दाव्याचे कामी करण्यासाठी म्हणून प्रस्तुतचा दुरुस्ती अर्ज दिलेला आहे.

3. अर्जास प्रतिवादीने दिलेल्या म्हणण्यात अर्ज उशीरा दाखल केल्याने खर्चाची रक्कम बसवुन मंजुर करावा या आशयाचे म्हणणे दिले आहे.

4. वादी तर्फे श्री. एस. आर. मेहता व प्रतिवादी तर्फे श्री. पी. आर. मेहता यांचा युक्तीवाद ऐकला. प्रतिवादी 3 हे दिनांक 19/02/2013 रोजी मयत झाले आहेत. प्रस्तुतचा अर्ज दिनांक 17/04/2013 रोजी दाखल केला आहे. अर्जाची तारीख पाहता तो 90 दिवसांचे आत मुदतीत दाखल केलेला आहे. दाव्याचे स्वरुप वाटपाचे असल्याने प्रतिवादी नंबर 3 चे वारस दाव्याचे कामी आवश्यक पक्षकार ठरतात. सबब अर्जातील विनंती मान्य करुन दुरुस्तीस मंजुरी देणे न्यायावह ठरते. सबब आदेश.

आ दे श

(1) दुरुस्ती अर्ज निशाणी 29 मंजुर करणेत येतो.

(2) वादीने प्रस्तावित दुरुस्ती मुळ दाव्याचे कामी करुन वारसांना नोटीस पाठविणेबाबतची पुर्तता सत्वर करावी.

( नि. ग. गोसावी )

दि. 01/04/2015. सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, माढा.